जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-10/2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 06.09.2019

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>**

**<u>स्थायी समितीच्या सभेची सूचना</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **<u>दिनांक 09.09.2019 रोजी दुपारी 03.00</u>** वाजता नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली इलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**
**श्री / श्रीमती ------------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं. 01**

दिनांक 30.01.2019, 11.02.2019, 05.03.2019 अंदाजपत्रकिय विशेष सभा, 08.03.2019 सकाळी 11.00 वाजता व 11.30 वाजता अंदाजपत्रकिय विशेष सभा, 11.07.2019 व 14.08.2019 रोजी मागील झालेल्या स्थायी समित्या सर्व सभांचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**विषय क्रं. 02**

**विषय :-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीत मौजे नविन कौठा येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा 12 फुट उंचीचा ब्रांझ धातुचा आश्वारुढ पुतळा तयार करुन निकषाप्रमाणे मंजुरी घेऊन दिलेल्या जागेवर फिट करणे इत्यादीसह पुर्ण असलेल्या कामातील वाढीव रक्कम मंजुर करणे बाबत

**संदर्भ :-** 1) निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/उद्यान/15327/18 दिनांक 15.01.18
2) मा. स्थायी समिती ठराव क्रं. 98 दिनांक 28.03.2018
3) कार्यारंभ आदेश क्रं. नावाशमनपा/उद्यान/2345/18 दिनांक 23.05.18
4) शिल्पाज आर्ट वर्क अमरावती यांचे पत्र दिनांक 16.02.19

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्दीत मौजे नविन कौठा येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा 12 फुट उंचीचा ब्रांझ धातुचा आश्वारुढ पुतळा तयार करुन निकषाप्रमाणे मंजुरी घेऊन दिलेल्या जागेवर फिट करणे इत्यादीसह पुर्ण कामासाठी शिल्पकार यांचेकडुन प्रस्ताव संदर्भ क्रं. 1 अन्वये इ-निविदा प्रक्रियेनुसार मागविण्यात आले होते.

त्यानुसार शिल्पाज आर्ट वर्क अमरावती यांची सर्वात कमी दराची निविदेवर वाटाघाटी अंती पुतळयाचे काम रुपये 35,00,000/- ऐवढया रक्कमेस ते करण्यास तयार असल्याचे कळवुन सदर कामास GST 12% रक्कम GST सहीत एकूण 39,20,000/- रुपये (एकोनचाळीस लक्ष विस हजार रुपये फक्त) मध्ये पुतळा तयार करुन बसवण्यास संदर्भ क्रं. 02 अन्वये मान्यता मिळाल्यानुसार संदर्भ क्रं. 03 अन्वये कार्यारंभआदेश देण्यात आलेले आहे. संबंधीत शिल्पकार यांनी क्ले मॉडेल तयार करुन लिंगायक समाजाच्या व महापालिकेल्या प्रतिनिधींना दाखवले असता क्ले मॉडेल मध्ये त्रुटी आढळुन आलेल्या आहेत. यामुहे पुतळयाचे 12 फुटी अश्वारुढ क्ले मॉडेल तोडुन परत समाजाच्या प्रतिनिधींच्या सुचनेप्रमाणे तयार करणे करिता रुपये 4,00,000/- ऐवढया वाढीव रक्कम देण्याची मागणी शिल्पकारांनी केलेली आहे.

संबंधीत शिल्पकाराने तयार केलेला पुतळयाचे मुळ क्ले मॉडेल तोडुन नविन क्ले मॉडेल तयार करण्याकरिता शिल्पकार वाढीव खर्च अपेक्षित असल्याने त्यासाठी संबंधीतांना लागणारी वाढीव 4,00,000/- + (12% GST) 48,000/- रुपये इतकी वाढीव रक्कमेस मान्यता देणे योग्य वाटते त्यास मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार शिल्पाज आर्ट वर्क अमरावती यांच्या उक्त कामाची मंजुरी किमंत रुपये 39,20,000/- + वाढीव 4,48,000/- रुपये असे एकूण 43,68,000/- रुपयांच्या रक्कमेस मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत मलनिस्सारण योजने अंतर्गत झोन क्रं. 04, 05 वजिराबाद / शिवाजीनगर भागात मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करिता मनपा स्थायी समितीचा ठराव क्रं. 17 दिनांक 11.07.19 अन्वये अंदाजपत्रक रुपये 35.00 लक्ष यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार रितसर निविदा सुचना ई-निविदा प्रसिध्द केली असता सदरील कामासाठी दोन निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा समिती समोर उघडल्या असता मे. श्री बि. जी. भास्करे नांदेड यांची निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा 5.01% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे.

करिता **श्री बि. जी. भास्करे कंत्राटदार नांदेड यांची निविदा 5.01% कमी दराची मंजुर करण्यासाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.**

**विषय क्रं. 04**

**विषय :-** केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय श्री गुरु गोविंदसिंघजी यांची 350 वी जन्मशताब्दी निमित्त नांदेड येथे मुलभुत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे बाबत

**संदर्भ :-** केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे प्रशासकिय मान्यता आदेश जा.क्रं. F.No. 10/2016-Special Cell दिनांक 07.03.2018

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाने श्री गुरु गोविंदसिंघजी यांची 350 वी जन्मशताब्दी निमित्त नांदेड येथे मुलभुत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे पत्र जा.क्रं. F.No. 10/2016-Special Cell दिनांक 07.03.2018 अन्वये Retrpfitting Stadium च्या कामासाठी रुपये 42,00,00,000/- कोटी निधीस आर्थीक मान्यता प्रदान केली आहे.

प्राप्त प्रशासकिय मान्यते मधील नमुद अटी शर्थी नुसार सदर कामाची Turn-Key पध्दतीने चार वेळेस निविदा मागविण्यात आली तथापि निविदेस अपेक्षीत प्रतिसाद मिळाला नाही. सदर बाब लक्षात घेता आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडीयम चे काम केलेल्या सल्लागाराकडून आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन बी-2 पध्दतीने निविदा प्रसिध्द केल्यास अपेक्षीत प्रतिसाद मिळेल या दृष्टीकोणातुन स्पेक डिझायनर्स या सल्लागाराची नियुक्ती करुन आराखडे तयार करण्यात आले. निविदा पध्दतीबदला बाबत मा. संचालक सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार यांना कार्यालयीन पत्र जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/13447/2018 दिनांक 15.12.2018 यांना प्रस्ताव सादर केला असता केंद्रशासनाने पत्र क्रं. F.No.30-10/2016-Special call दिनांक 22.01.2019 अन्वये बी-2 पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता प्रदान केली आहे.

सल्लागार यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार कामाची निविदा प्रक्रिया हाती घेण्यात आली. प्रथम वेळेस एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे कामाची दुस-या वेळेस निविदा मागविली असता विहित वेळेत शारदा कन्सट्रकशन अन्ड प्रा लि. नांदेड यांची एकच निविदा प्राप्त झाली सदरील निविदा उघडली असता GST सहीत दर मागवले असतांना अतिरिक्त GST कराची मागणी केल्याने संबंधीतांची सुरक्षा ठेव जप्त करुन फेरनिविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर कामाच्या निविदा प्रक्रियेस मिळणारा अल्प प्रतिसाद लक्षात घेता तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रचलीत निविदा पध्दती विचारात घेता GST व इतर कर वगळुन अंदाजपत्रकीय किमंतीवर आधारीत निविदा मागविण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार सदर कामासाठी पुनश्च निविदा मागविण्यात आली. त्यावेळी 02 निविदा प्राप्त होवुन कमी दराची निविदा शारदा कन्सट्रक्शन अन्ड कार्पोरेशन प्रा.लि. नांदेड यांची असुन संबंधीतांनी रुपये 77,22,81,740/- दर सादर केले होते. सदरचे काम बाबनिहाय असल्याने व कांही बाबीच्या परिमानात झालेल्या बदलामुळे सादर केलेल्या दरानुसार व BOQ परिमाणा नुसार शारदा कन्सट्रक्शन अन्ड कार्पोरेशन प्रा.लि. नांदेड यांनी सादर केलेली रक्कम रुपये 77,22,81,740/- ऐवजी रक्कम रुपये 68,06,58,657/- होत आहे.

सल्लागार यांनी सादर केलेले अंदाजपत्रक (सर्व कर वगळुन) रुपये 54,81,30,792/- असून कंत्राटदाराने सादर केलेले दर 58,06,58,657/- जास्तीचे वाटत असल्याने संबंधीतास कार्यालयीन पत्र जा.क्रं. नावाशमनपा/साबांविं/5510/2019 दिनांक 26.08.2019 अन्वये दर पृथकरणासह वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीतांनी दिनांक 27.08.2019 रोजी दर कमी करुन सदरचे काम रुपये 65,31,07,760/- रक्कमेमध्ये करण्याचे कळविले. तथापि सदर दरही जास्तीचे वाटत असल्याने संबंधीतास पुनश्च वाटाघाटीसाठी पाचारण केले असता संबंधीतांनी वाटाघाटी अंती रुपये 63,00,76,346/- रक्कमेत काम करण्याची तयारी दर्शवुन फेरदरपत्रक सादर केले आहे.

करिता सदर कामासाठी शारदा कन्सट्रक्शन अन्ड कार्पोरेशन प्रा.लि. नांदेड यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार दर मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 07 मध्ये अरविंदनगर भागात सी.सी. रस्ता करणे रुपये 45,66,200/-

**संदर्भ** :- कार्यालयीन आदेश क्रं. 5004/2019 दिनांक 14.08.2019

नांदेड वाघाळा शहरम हानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 07 मध्ये अरविंदनगर भागात सी.सी. रस्ता करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार रुपये 45,66,200/- करिता निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/5033/2019 दिनांक 14.08.2019 अन्वये दैनिक लोकमत (राज्यस्तरीय) / दैनिक मराठवाडा या वृत्तपत्रात दिनांक 15.08.2019 अन्वये निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 05.09.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेले दर |
|---|---|---|
| 01 | मे. कुट्टी कन्स्ट्रक्शन नांदेड् | अंदाजपत्रकिय |
| 02 | एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड | 5.80% जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. कुट्टी कन्सट्रक्शन नांदेड यांची निविदा कमी दराची असुन जी अंदाजपत्रकिय दराची आहे.

करिता सदर कामासाठी मे. कुट्टी कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 45,66,200/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर.

मुख्य लेखाशिर्ष :- नविन रस्ते, नपिवन नाली-शहरातील मुख्य रस्त्याचे हॉटमिक्स करणे
एकूण लेखाशिर्ष :- रुपये 25,00,00,000/-
पुर्वी झालेला खर्च :- रुपये 72,60,617/-
या कामावर होणारा खर्च :- रुपये 45,66,200/-
शिल्लक रुपये :- रुपये 23,21,48,116/- दिनांक 05.09.2019

**विषय क्रं. 06** **अपिल** **दिनांक 13.08.2019**

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

**विषय** :- माझ्यावर लावण्यात आलेली शास्ती अन्यायकारक असल्यामुळे ती रद्द करणेसाठी विनंती अपिल अर्ज
**संदर्भ** :- कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आस्था-1/3759 दिनांक 17.07.2019

**महोदय,**

सेवेत विनंती करण्यात येते की संदर्भीय आदेशाव्दारे माझ्या विरुध्द निलंबन प्रकरणी चौकशी अंतीम 3 दोषारोप सिध्द झाल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2) (ब) मधील तरतुदीनुसार एक वार्षिक वेतनवाढ कार्यमस्वरुपी गोठविण्यात आली आहे.

सदरची शास्ती अन्यायकारक असुन माझे आर्थीक नुकसान करणारी आहे जी माझ्या सारख्या कनिष्ठ कर्मचा-यास परवडणारी नाही

कृपया माझ्या विरुध्द लावण्यात आलेली शास्ती रद्द करुन मला न्याय देण्यात यावा व माझा अपिल अर्ज स्विकृत करावा हि नम्र विनंती.

**आपला नम्र,**
**स्वाक्षरीत/-**
**ज्ञानेश्वर उत्तमराव राठोड**
**फारयरमन, अग्निशमन विभाग**
**नावाशमनपा नांदेड**

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून विविध कर लागु करण्यात येत आहेत त्या त्या तारखे पासुन अंदाजपत्रकात तो कर समाविष्ट करण्यात यावे. अनेक अंदाजपत्रकात GST व Insurance च्या समाविष्ट नाही असे सर्व अंदाजपत्रकात काम पूर्ण होण्यापुर्वी अंतिम देयक सदरच्या वेळेस त्या त्या अंदाजपत्रकात समाविष्ट करुन घेण्यास हि स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

शासनाकडून प्राप्त निधीतुन अंदाजपत्रका पेक्षा जास्तीची रक्कम अंदाजपत्रकातील लांबी व रुंदी किंवा कांही बाबी कमी न करता मनपा निधीतुन अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीची रक्कम अदाई करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** अ. शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक** :- अ. लतीफ अ. मजीद

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली इलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.